# शाहू महाराजांचे जातिभेदनिर्मूलनासंबंधीचे विचारआणि अस्पृश्योध्दारासाठीचे कार्य

**अरविंद अनिल घोडके,** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, न्यू कॉलेज, कोल्हापूर.

arvindghodake99@gmail.com

………………………………………………………………………………………………...

**प्रस्तावना:**

अस्पृश्यांचा उध्दार हे आपले जीवित कर्तव्य मानून शाहू महाराज जातीभेद निर्मूलनासाठी अखंडपणे कार्यरत राहिले. महाराजांना जातीभेद मान्य नव्हता. जातिभेद पाळणे त्यांनी पाप मानले. आपल्या जातीपुरते न पाहता आपल्या जातीबाहेर पिढ्यानपिढ्या अज्ञानात खितपत पडलेल्या समाजाची जाणीव ठेवून या समाजाला प्रगतीची समान संधी मिळवून देणे ही आपली सामाजिक आणि नैतिक बांधिलकी असल्याची जाणीव त्यांनी करून दिली. वरच्या जातीतील लोकांनी खालच्या जातीतील लोकांना संधीचे मार्ग मोकळे करून दिले पाहिजेत अशी सार्वजनिक भूमिका घेतली.

शाहू महाराजांनी जातिभेद संपविण्यासाठी अनेक समाज क्रांतिकारक निर्णय घेतले. त्यांनी विषमतेला चालना देणारी बलुतेदारी पद्धती रद्द केली. सक्तीची हजेरी पद्धत बंद करून गुन्हेगार जमातींची जुलमी पद्धतीतून मुक्तता केली.अस्पृश्यता प्रतिबंधक कायदा करून विषमतावादी मानासिकेतेच्या व्यवस्थेला लगाम घातला. अस्पृश्यांना शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून त्यांच्या प्रगतीला हातभार लावला. शाळा काढल्या. वसतिगृहे उभा केली. शिष्यवृत्ती देऊन शिक्षण घेणाऱ्यास प्रोत्साहन दिले. अस्पृश्यांना सरकारी नोकऱ्या मध्ये प्राधान्य दिले. वकिली सनदा दिल्या. महाराजांनी आपल्या संपूर्ण कारकीर्दीत जातिभेदाच्या विरुद्ध भूमिका घेतली. अस्पृश्यता निर्मूलनासाठी जाहिररीत्या सर्व शक्तीनिशी प्रयत्न केले. अस्पृश्यांचा कैवार घेत पदोपदी प्रस्थापित जातीयवादी व्यवस्थेशी संघर्ष केला.जातिभेद निर्मूलनाच्या कार्यापासून तसूभरही न ढळता अस्पृश्योद्धारासाठी आंतरिकतळमळीने शाहू महाराज शेवटपर्यंत कार्य करीत राहिले.

प्रस्तुत शोध निबंधात राजर्षी शाहू महाराजांच्या जातीभेद निर्मूलनाच्या विचारांचा आणि अस्पृश्योध्दारासाठी केलेला कार्याचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**संशोधन हेतू :**

**१.** शाहू महाराजांच्या जातिभेदनिर्मूलनासंबंधीच्याविचारांचा अभ्यास करणे .

**२.** शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या उध्दारासाठी केलेल्या कार्याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

सदर शोध निबंध लिहिण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे.

**संशोधन सामग्री:**

प्रस्तुत शोध निबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये उपलब्ध संदर्भ ग्रंथ, शोध निबंध, मासिके या सामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे.

**आशय विश्लेषण :**

**शाहू महाराजांचे जातिभेदनिर्मूलनासंबंधीचे विचार :**

शाहू महाराजांनी जातिनिर्मूलनासंबंधी मूलगामी विचार मांडले. अस्पृश्यांची गुलामगिरीतून मुक्त करणे हे त्यांनी जीवित कर्तव्य मानले. भारतातील जातीव्यवस्था हीच इथल्या अन्याय व्यवस्थेचे कारण आहे हे त्यांनी जाणले होते. जाती व्यवस्था मत्सराला जन्म देते आणि माणसांना माणसांमध्ये विभागून सोडते. जातीव्यवस्था मानवतेच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधामध्ये असून आपणास खरे स्वराज्य हवे असेल तर ही अन्यायी आणि क्रूर जातीव्यवस्था फेकून दिली पाहिजे याविचाराने शाहू महाराज सदैव प्रयत्नशील राहिले.जातीभेद मोडण्याचे कार्य राष्ट्रकार्य असूनयासाठी ब्राह्मण आणि मराठे या उच्च जातींच्या सहकार्याने समता प्रस्थापित होऊ शकेल हा विश्वास त्यांना होता.उच्च जातींनी मागासलेल्या जातींचा द्वेष न करता त्यांच्या प्रती सहानुभूती दाखवून त्यांना प्रेमाने वागविण्याची भूमिका त्यांनी घेतली.

हिंदुस्तानातील जातीव्यवस्था जातीभेद हिडीस असून आपल्या सर्वांसाठी लज्जास्पद आहे असे ते म्हणत.अस्पृश्यता ही पाप मानून ती पाळणाऱ्यांचा त्यांनी धिक्कार केला. जातीभेदामुळे आपल्या धर्मात निर्माण झालेला उच्च-नीचपणा त्यांनी अमान्य केला. त्यांनी जातीप्रथेच्या निर्मूलनातून अस्पृश्यांच्या गुलामगिरी आणि बंधनाच्या मुक्ततेचे महत्व प्रतिपादित केले. अस्पृश्यता निवारणाच्या कामी व सामाजिक समता निर्माण करण्याच्या प्रश्नात शाहू महाराजांचे विचार व कार्य मूलगामी आणि क्रांतिकारी स्वरूपाचे होते. महाराजांनी जाति निर्मूलनाच्या विचारांना आपल्या राज्यात

कायद्याचे स्वरूप दिले. त्याची काटेकोर अंमलबजावणीही केली. आपल्या राज्यातील सर्व दलितांना आपल्या विचारांचा व कृतीचा आधार देऊन त्यांचा उध्दार घडवून आणला.

**शाहू महाराजांनी जातिभेद निर्मूलनासाठी सुचविलेल्या उपाययोजना :**

शाहू महाराजांनी अमानुष जाती व्यवस्था संपवण्यासाठी उपाययोजनाही सुचविल्या. जन्म आणि संपत्तीवर आधारित सामाजिक स्तर नष्ट झाला पाहिजे. सरकारी सेवेत एका विशिष्ट जातीतीलच कर्मचाऱ्यांची भरती थांबवली पाहिजे.आंतरधार्मिय तसेच आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले पाहिजे. नोकर भरती करताना सर्वांना समान संधी आणि गुणवत्ता हाच निकष असावाअसे उपाय सुचविले. जातीव्यवस्था मोडीत काढण्यासाठी जातीअंताचा लढा तीव्र करण्यावर त्यांनी भर दिला.

**शाहू महाराजांनी अस्पृश्योध्दारासाठी केलेले कार्य :**

शाहू महाराजांनी शिक्षण प्रसार आणि जातीभेदाचे निर्मूलन या दोन सामाजिक सुधारणावर प्रामुख्याने भर दिला. अस्पृश्य आणि मागास जातीतील लोकांच्या सर्वांगीण प्रगतीचा ध्यास घेतला.

**१. मागासवर्गीयांसाठी आरक्षण धोरणाची सुरुवात :**

२६ जुलै १९०२ रोजी शाहू महाराजांनी मागास जातींना आरक्षण लागू करण्याचा ऐतिहासिक आणि क्रांतिकारी निर्णय घेतला. या जाहीरनाम्यांतर्गत आपल्या संस्थानातील सर्व खात्यातील नोकरीच्या जागांपैकी ५० टक्के जागा मागासलेल्या वर्गासाठी राखीव ठेवल्या. करवीर संस्थांनातील ब्राह्मण, प्रभू, शेणवी, पारसी व इतर सर्व प्रगत वर्ग सोडून मागासलेल्या जातींसाठी ५० टक्के आरक्षण लागू केले. सरकारी नोकऱ्या मधील ब्राह्मण वर्गाची मक्तेदारी मोडून काढत मागास जातीतल्या लोकांनाही प्रगतीची समान संधी देण्याच्या उद्देशाने हा क्रांतिकारक जाहीरनामा करवीर संस्थानात लागू केला. सामाजिक न्याय, समता आणि बंधुता प्रस्थापित करण्याच्या दृष्टिकोनातून शाहू महाराजांनी घेतलेला हा निर्णय सामाजिक क्रांती करणारा होता.या निर्णयाने मागासवर्गीयांसाठी आरक्षण देणारे छत्रपती शाहू महाराज हे देशातील पहिले राजे ठरले.

**२. बलुतेदारी पद्धती रद्द करणारा कायदा: १९१८:**

बलुतेदारी पद्धतीने व्यवसाय निवडीवर बंधने घातली होती. तत्कालीन सामाजिक परिस्थितीत जन्माने प्राप्त झालेला व्यवसाय करणे बंधनकारक होते. इतर जातींचा व्यवसाय करणे गुन्हा होते.यामुळे बलुतेदारी पद्धती ही शोषणकारी व्यवस्था बनली होती. ही अमानुष पद्धती बंद झाल्याशिवाय मागासजातींचा उध्दार होणार नाही हे महाराजांनी जाणले होते.याच जाणीवेतून त्यांनी २२ फेब्रुवारी १९१८ रोजी जाहीरनामा काढून बैठे बलुते ही शोषणकारी व्यवस्थाच रद्द करून टाकली. बलुतेदारीने बंदिस्त केलेल्या अस्पृश्य आणि मागास जातीतील लोकांना आपल्या कौशल्य, गुणवता आणि आवडीनुसार व्यवसाय करण्याची संधी प्राप्त करून दिली. या कायद्यान्वये शाहू महाराजांनी बलुतेदारांची सामाजिक गुलामगिरीतून मुक्तता केली.

**३. अस्पृश्यांची हजेरी पध्दत रद्द :**

शाहू महाराजांनी ३ ऑगस्ट १९१८ रोजी अस्पृश्यावरलादलेली ही सक्तीची हजेरी पध्दत बंद करून गुन्हेगार समजलेल्या जातींची या अमानुष त्रासातून मुक्तता केली. अस्पृश्य जातीतील महार, मांग, रामोशी तसेच बेरड अशा काही जातींना सक्तीची हजेरी होती. गैरहजेरीची भीती दाखवून त्यांना अमानुष वागणूक दिली जात असे. या जुलमी प्रथेचा गैरफायदा घेत उच्च जातीतील लोक अस्पृश्यांची पिळवणूक करीत. शाहू महाराजांनी ही जुलमी आणि गुलामीची प्रथा बंद करून अस्पृश्यांना सन्मानाने जगण्याचे बळ दिले.

**४. महार वतने रद्द : १९१८:**

वतन म्हणजे महारांना गाव कामाच्या मोबदल्यात मिळालेला जमिनीचा तुकडा. या तुकड्या करता संपूर्ण महार जातीला वेठबिगारी करावी लागत. वतनदारी ही गुलामगिरी पद्धती महाराजांनी रद्दबातल केली. वतन म्हणून मिळालेल्या जमिनी त्यांच्याकडेच राहू दिल्या. त्या जमिनी रयतावा केल्या. महार वतन खालसा करतानात्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा मौलिक सल्लाही घेतला. शाहू महाराजांनी महार वतने रद्द करून अस्पृश्यांच्या वेठबिगारीच्या अमानुष प्रथेला कायमचा सुरुंग लावला. स्वातंत्र्योत्तर कालखंडात फुले, शाहू, आंबेडकरांचा वसा घेतलेल्या यशवंतराव चव्हाण यांच्या अविरत प्रयत्नातून स्वतंत्र भारतात १९७६ च्या कायद्यान्वये अस्पृश्यांना या गुलामगिरीतून मुक्त केले. त्याचा पाया शाहू महाराजांनी घातला होता.

**५. अस्पृश्यता प्रतिबंधक जाहीरनामा १९१९:**

शाहू महाराजांच्या जातीभेद निर्मूलन कार्यातील क्रांतिकारी निर्णय म्हणजे त्यांचा अस्पृश्यता निवारणाचा जाहीरनामा होय. या जाहीरनाम्यान्वये अस्पृश्य जातीतील लोकांशी कोणताही प्रकारचा भेदभाव करणे हे गुन्हा ठरवले गेले. अस्पृश्य जातीतील लोकांचा विटाळ न मानता त्यांना समानतेने वागवण्याचा वटहुकूम काढला. अस्पृश्यांना सभ्य लोकांप्रमाणेच वागविण्याची ताकीद दिली.सार्वजनिक इमारती, धर्मशाळा, रेस्ट हाऊसेस, सरकारी अन्नछत्र, नदीची पात्रे, सार्वजनिक विहिरी, महसूल, न्याय, शिक्षण तसेच धर्मादाय दवाखाने अशा ठिकाणी अस्पृश्यतेचे पालन करू नये असा आदेश दिले. या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी व्हावी यासाठी याचे उल्लंघन करणाऱ्यास शिक्षा करण्याचे फर्मानही काढले.

**६.अस्पृश्यांना संस्थानातील नोकऱ्यांमध्ये बढतीच धोरण:**

तत्कालीन करवीर संस्थानातील नोकऱ्यांमधील ब्राह्मणादी जातींचे वर्चस्व मोडीत काढत अस्पृश्य जातीतील लोकांचे नोकऱ्यांचे प्रमाण वाढवण्यासाठी महाराजांनी सरकारी नोकऱ्यांत बढतीचे धोरण लागू केले. अस्पृश्यांना बढतीचे धोरण लागू करून त्यांना खाजगी व सरकारी नोकरीत प्राधान्य दिले.अस्पृश्य जातींचा सामाजिक व आर्थिक स्तरउंचावण्यासाठी तलाठी, पोलीस, सरकारी पागा,शिकार तसेच टपाल खात्यात अस्पृश्य जातींतील लोकांच्या नेमणुका केल्या. रामचंद्र सखाराम कांबळे यांची प्रशासनामध्ये तर धोंडदेव व्हटकर यांची फॉरेस्ट खात्यामध्ये दप्तर बंदम्हणून नेमणूक केली.दत्तू पवारयांना पोलीस खात्यात, प्रशिक्षित रामू महार, दादू महार यांची हत्तीवरील माहूत तर यल्लाप्पा नाईक यास मोटार ड्रायव्हर म्हणून नेमले. गंगाराम कांबळे यास 'सत्यसुधारक' हॉटेल काढून दिले. म्युनिसिपाल्टीच्या चेअरमन पदी दत्तोबा पवार चांभार यांची तर म्युनिसिपल मेंबर म्हणून हिरा मदार भंगी यांची नेमणूक करून अस्पृश्यांच्या सामाजिक पुनरुत्थानातील ऐतिहासिक पाऊल उचलले.

**७. अस्पृश्य जातीतील लोकांना वकिलीच्या सनदा :**

शिक्षण, सरकारी नोकऱ्या, तलाठी, वकिली अशा विविध पदांवर उच्च जातीतल्या लोकांची मक्तेदारी होती. गुणवत्ता असूनही अस्पृश्य जातीतल्या लोकांना जाती व्यवस्थेच्या निर्बंधामुळे ही पदे मिळत नसत. यामुळेच शाहू महाराजांनी अस्पृश्य जातीतील पात्र लोकांना वकिलीच्या सनदा बहाल करण्याचा निर्णय घेतला. तलाठ्यांच्या जागेवर अस्पृश्य वर्गातील लोकांची भरती व्हावी यासाठी तलाठी वर्ग सुरू केले. अस्पृश्य उमेदवारांना विशेष शिष्यवृत्ती देऊन प्रशिक्षित केले. अशा प्रशिक्षित अस्पृश्यांना अग्रक्रमाने तलाठी म्हणून नेमण्यासाठी खास हुकूम जारी केला. संस्थानातील नोकऱ्यात महार, मांग, चांभार वगैरे अस्पृश्य जातीच्या लोकांना प्राधान्य देण्याचे आदेश दिले. अस्पृश्य जातींना प्रगतीची दारे खुली होऊन त्यांच्या स्थितीत सुधारणा व्हावी आणि त्यांना सन्मानाने जगण्याची समान संधी प्राप्त व्हावी ही उदात्त भावना त्यांच्या निर्णयामागे होती.

**८. शिक्षणातून अस्पृश्योध्दार:**

शिक्षणाशिवाय अस्पृश्यांचा विकास अशक्य आहे याची जाणीव शाहू महाराजांना होती.शिक्षण हाच तरणोपाय मानून त्यांनी शैक्षणिक प्रसारची चळवळ सुरू केली. पिढ्यानपिढ्या अज्ञान आणि दारिद्र्याच्या चक्रात अडकलेल्या अस्पृश्यांना यातून बाहेर पडण्यासाठी मोफत शिक्षणाचीसोय केली. सर्व जातीतील लोकांना समान न्यायाने शिक्षण घेता यावे म्हणून जातीनिहाय वसतिगृहांची उभारणी केली. अस्पृश्य जातीतील मुलांसाठी रात्र शाळा सुरू केल्या तर मुलींच्या शाळांना मंजुरी दिली. गरीबीमुळे अस्पृश्य जातीतील मुलांचे शिक्षण थांबू नये म्हणून २४ नोव्हेंबर १९११ ला मोफत शिक्षणाची सुरूवात केली. या जातीतील मुलांना शिष्यवृत्ती सुरू केली. २९ सप्टेंबर १९१७ रोजी सक्तीच्या आणि मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा करून अस्पृश्य आणि बहुजन समाजाचा उध्दार केला..

**९. जातीभेद निर्मूलनासाठी बेटी व्यवहारास प्राधान्य:**

शाहू महाराजांनी बेटी व्यवहार हा जाती निर्मूलनाचा एक प्रभावी उपाय म्हणून पहिले. जातीभेद निर्मूलनासाठी केवळ रोटी व्यवहार पर्याप्त नसून त्यासाठी बेटी व्यवहारही झाले पाहिजेत यासाठी ते आग्रही होते. जातिभेद नाहीसा होण्यास भिन्नभिन्न जातींचे शरीर संबंध विस्तृत प्रमाणावर होणे फार जरुरीचे असल्याचे त्यांना वाटत होते. समाजातील जातीव्यवस्था कमी व्हावी यासाठी त्यांनी जाणीवपूर्वक मिश्र विवाह व्हावेत यासाठी पुढाकार घेतला. तसेच निरनिराळ्या जातींच्या संस्थानिकांनी आंतरजातीय विवाहास चालना द्यावी असे धोरण स्वीकारले. आपल्या संस्थानात आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता देणारा कायदा मंजूर केला. चुलत भगिनी चंद्रप्रभा यांचा विवाह इंदूरच्या तुकोजी होळकरांचे पुत्र यशवंत यांच्याशी निश्चित करून आपला पिंड बोलक्या सुधारकांपेक्षा कृतीशील कार्यकर्त्याचा असल्याचे दाखवून दिले.

**१०. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वास सहकार्य :**

अस्पृश्यसमाजाच्या विकासासाठी झटत असताना त्यांच्यातील नेतृत्व विकसित व्हावे हा त्यांचा दृष्टिकोन होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नेतृत्व विकसित करण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. महाराजांनी बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रात दलितोध्दाराच्या कार्यातमोठे कार्य केले. बाबासाहेबांना'मूकनायक' नावाचे पाक्षिक काढण्यास आर्थिक सहाय्य केले. बाबासाहेबांना १९२० साली लंडनमधील उच्चशिक्षण पूर्ण करण्यास आर्थिक मदत केली. पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी अस्पृश्यांच्या चळवळीचे नेतृत्त्व केले. स्वतंत्र भारताची राज्यघटना लिहून जातीभेद निर्मूलनासाठी कायदेशीर प्रयत्न केले. या कार्यास शाहूंचे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहकार्य लाभले. बाबासाहेबांनी शाहू महाराजांना सामाजिक लोकशाहीच्या चळवळीचे आधारस्तंभ म्हणून गौरवले. महाराजांच्या निधनानंतर अस्पृश्य समाज आपल्या सर्वात महान कैवाऱ्याला मुकल्याची खंत त्यांनी व्यक्त केली..

**निष्कर्ष:**

१. शाहू महाराजांच्या आरक्षण धोरणामुळे अस्पृश्यांना प्रगतीची संधी प्राप्त झाली.

२. अस्पृश्यांना शिक्षण घेण्याची संधी मिळाली. नोकऱ्या मिळाल्या. त्यांचा सामाजिक स्तर उंचावण्यास मदत झाली.

३. अस्पृश्य मागास जातीतल्या लोकांचा स्वाभिमान जागृत करण्याचे काम शाहू महाराजांनी केले.

४. भारतीय समाज व्यवस्थेत जातिव्यवस्थेने बहिष्कृत केलेल्या अस्पृश्य बांधवांना समाज प्रवाहात आणण्याचे कार्य केले.

५. शाहू महाराजांनी अस्पृश्य जातीतल्या लोकांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी पूरक परिस्थिती निर्माण केली.

६. अस्पृश्यांना आपले कर्तृत्व आणि गुणवत्ता दाखवण्याची संधी मिळाली.

७. अस्पृश्य समाजातील लोकांची आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक परिस्थिती बदलण्यास चालना मिळाली.

**सारांश :**

अस्पृश्यांना दारिद्र्याच्या आणि दुःखाच्या चिखलातून बाहेर काढणे हे शाहू महाराजांनी पवित्र आणि आद्य कर्तव्य मानले.जातिभेद अस्पृश्योध्दारातील सर्वात मोठा अडथळा मानून त्याच्या निर्मूलनासाठी महात्मा फुल्यांनी सुरु केलेल्या सामाजिक चळवळीला कायद्याच्या माध्यमातून गतिमान केले. अस्पृश्यांना आपली भावंडे समजून त्यांच्यात आत्मविश्वास व प्रतिष्ठा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मागासवर्गीयांची सेवा म्हणजे अखिल मानव जातीची सेवा या पवित्र भावनेतूनस्वतःला त्यांच्याप्रती समर्पित केले.स्वत:ला अस्पृश्यांचे दास मानून त्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठीपदोपदी तत्कालीन समाज व्यवस्थेतील प्रस्थापित जातींच्या मक्तेदारीला आव्हान दिले. संघर्ष केला. अस्पृश्यांची सर्वतोपरी काळजी घेऊन त्यांना समानतेच्या पातळीवर आणून ठेवण्याचे महान कार्य शाहू महाराजांनी केले. अनेक क्रांतिकारी निर्णय घेत अस्पृश्य समाजास युगानुयुगाच्या सामाजिक गुलामगिरीतून मुक्त केले. गावकुसा बाहेर राहणाऱ्या लोकांना खऱ्या अर्थाने सामाजिक न्याय दिला. मान, सन्मान आणि त्यांचे हक्क मिळवून दिले.सामाजिक न्याय, समता आणि बंधुता या तत्वांसाठी झटणाऱ्या सर्वांनाच शाहू महाराज एक प्रेरणास्त्रोत असतील. शाहू महाराजांनी जातिनिर्मूलन आणि अस्पृश्योध्दारासाठी केलेले बहुमूल्य कार्य युगानुयुगे बळ, प्रेरणा आणि मार्गदर्शन देत राहिल.

**संदर्भ ग्रंथ:**

**१.** कीर धनंजय (२०२२). राजर्षी शाहू छत्रपती, पॉप्युलर प्रकाशन,मुंबई.

२. कीर धनंजय (२०१९). प्रेषित राजर्षी शाहू छत्रपती, शिवाजी विद्यापीठ, प्रकाशन, कोल्हापूर.

३. जाधव रमेश (२०१८). लोकराजा शाहू छत्रपती, सुरेश एजन्सी, पुणे.

४. जाधव रमेश(२०२०). राजर्षी शाहू छत्रपती वाद आणि वास्तव, सुरेश एजन्सी, पुणे.

५. मोरे सदानंद (२०२२). महाराष्ट्राची लोकयात्रा, सकाळ मिडिया प्रा.लि.,पुणे.

६. साळुंखे पी.बी.(संपा).(२०१६). राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग सचिवालय, मुंबई.

७. पवार जयसिंगराव (२०१९).राजर्षी शाहू एक दृष्टिकोन, भाग्यश्री प्रकाशन, कोल्हापूर,

८. चव्हाण रा.ना. (२०१३). लोकनेते राजर्षी शाहू महाराज काळ आणि कार्य, रमेश चव्हाण प्रकाशन, पुणे.

९. कांबळे नारायण, बलांडे व्यंकट, शिंदे संजय(संपा.) (२०११), राजर्षी शाहू: नव्या दिशा नवे चिंतन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

१०. पवार शिरीष (२०१२). राजर्षी छत्रपती शाहू महाराज, सह्याद्री प्रकाशन, पुणे.

११. भोसले व्यंकप्पा (२०२२). राजर्षी शाहू महाराज आणि भटके-विमुक्त, भटके-विमुक्त विचारमंच प्रकाशन, कोल्हापूर.